9/7/24
5:35

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०९/०७/२०२४

# प्रेसनोट

### उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये मास्टर ट्रेनर यांना प्रशिक्षण

उल्हासनगर महानगरपालिकेने सन २००५ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू केली आहे. नुकतेच सर्व कर्मचारी यांना या योजनेचे PRAN किटचे वाटप करण्यात आले होते. आज या योजनेच्या अनुषंगाने ९० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून हे सर्व कर्मचारी मास्टर ट्रेनर म्हणून काम करणार असल्याचे मुख्य लेखा अधिकारी श्री. किरण भिलारे यांनी सांगितले.

महापालिका आयुक्त डॉ. अझीझ शेख यांच्या संकल्पनेतून सदर प्रशिक्षणाचे आयोजन केल्याचे तसेच लवकरच सर्व कर्मचारी यांचा अंशदायी निवृत्ती वेतन योजनेचा निधी त्यांच्या NPS खात्यावर वर्ग केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रशिक्षणासाठी श्री. मधुसूदन दास, व्हॉईस प्रेसिडेंट, प्रोटिन, श्री. आशिष कुमार, मॅनेजर, NPS ट्रस्ट, दिल्ली, तसेच श्री सूर्यकांत तरे, असिस्टंट मॅनेजर, प्रोटीन, मुंबई यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेविषयी शंकांचे निरसन केले व योजनेविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, मुख्य लेखा अधिकारी श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा परीक्षक श्री. शरद देशमुख, उपमुख्य लेखाअधिकारी श्री. विजय खेडकर, लेखा अधिकारी श्री. विलास नागदिवे, श्री. संजय वायदंडे, श्री. दीपक धनगर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

(छाया प्रकाश ढोमळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.